<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३७५/२०२२ मधील नि. १३ वरील आदेश</u>.

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र.१ व ३ ते ५ यांनी अर्जात कथन केले आहे की, त्यांना समन्सची बजावणी झाल्यावर त्यांनी मुदतीत कैफियत देणे आवश्यक होते परंतु, कैफियत देणेकामी आवश्यक असणारी कागदपत्रे व माहिती मुदतीत उपलब्ध न झाल्यामुळे प्रतिवादींना कैफियतीसंबंध महत्वाची माहिती वकीलांना देता आली नाही व त्यामुळे वेळेत कैफियत देता आली नाही. दावा स्थावर मिळकतींबाबत असून प्रतिवादींची कैफियत व म्हणणे न स्वीकारल्यास त्यांचे नुकसान होईल. त्यामुळे त्यांचेविरुध्द झालेला 'विनाकैफियत आदेश रद्द होवून कैफीयत स्वीकारण्यात यावी असे प्रतिवादी यांचे कथन आहे.

३. वादींनी त्याच अर्जावर म्हणणे देवून अर्जास विरोध केला. वादीचे कथनानुसार, उशिरा म्हणणे देण्याबाबत अर्जात नमुद कारण योग्य व संयुक्तिक नाही. दाव्याचे कामकाज लांबविण्याच्या दृष्टीने उशिरा कैफियत दिली आहे. त्यामुळे, अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा व अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींवर खर्च बसवावा असे वादींचे कथन आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.१ व ३ ते ५ यांना दिनांक १४/१०/२०२२ रोजी समन्सची बजावणी होवून ते दिनांक ०७/११/२०२२ रोजी प्रकरणात हजर झाले. त्यांनी समन्स बजावणी पासुन कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत देणे आवश्यक होते. प्रतिवादी यांनी मुदतीत कैफीयत न दिल्याने दिनांक १३/०१/२०२३ रोजी त्यांचे विरुद्ध विना कैफियत आदेश झाला आहे. प्रस्तुत अर्ज दिनांक

०५/०७/२०२३ रोजी दिला आहे. यावरुन कैफीयत दाखल करण्यास ५ महिने व २० दिवस विलंब झाला आहे. प्रस्तुत दावा प्रतिवादी क्रमांक २ करिता तजवीज करण्यासाठी नेमला असतांना प्रस्तुत अर्ज दिला आहे. त्यामुळे अर्ज मंजुर झाल्यास दाव्याच्या स्थितीवर विशेष विपरीत परीणाम होणार नाही. वादपत्राचे अवलोकन करता, प्रस्तुत दावा वाटपासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांना कैफीयत देण्यास संधी न दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय आवश्यक पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. या सर्व बाबींचा विचार करता, तसेच अर्जात नमूद कथनांचा विचार करता, झालेल्या विलंबाबाबत वादीना खर्च अदा करण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करणे संयुक्तिक ठरणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. नि. १३ येथील अर्ज, प्रतिवादी क्र.१ व ३ ते ५ यांनी वादी यांना पुढील तारखेस अगर तत्पुर्वी रक्कम रु. ५००/- खर्च देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व ३ ते ५ यांनी वरीलप्रमाणे पुर्तता केल्यावर, त्यांनी दाखल केलेली कैफीयत वाचुन नोंदविण्यात येईल.

**सही/**

श्रीगोंदा.

दिनांक ०९/०१/२०२४.

**( जी. एम. साधले )**
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.